

Rayat Shikshan Sanstha's,

# Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,

# Ramanandnagar (Burli)



## Department Of Marathi

**Two Day Multilingual Online National Conference On**

**"Subaltern Literature: Significance and Relevance"**

**25 th and 26 th November 2021**

---

## अहवाल (REPORT)

**दिवस पहिला : २५ नोव्हेंबर,२०२१ वार- गुरूवार**

**उद्‌घाटन सत्र**

सन 2021-22 या शैक्षणिक वर्षात मराठी, हिंदी व इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्‌यमाने आयोजित दोन दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनासाठी प्रमुख पाहुणे व उद्‌घाटक मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे (ऑडिटर,रयत शिक्षण संस्था, सातारा),तर दुसरे प्रमुख पाहुणे व उद्‌घाटक मा. प्रा (डॉ.) तृप्ती करेकट्टी (विभागप्रमुख, इंग्रजी विभाग, शिवाजी विद्‌यापीठ, कोल्हापूर) यांनी दि. २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी औपचारिक उद्‌घाटन केले. बीजभाषक म्हणून प्रा. के. श्रीपाद भट (Dean, Faculty of Languages & Literature, Professor & Head, Dept. of English Goa University) हे होते. अत्यंत अभ्यासपूर्ण स्वरूपात भारतीय परिप्रेक्षातून त्यांनी वंचित आणि शोषित समाजाच्या साहित्याचा वेध घेतला.

**सत्र पहिले**

सदरचे सत्र हिंदी विषयाचे झाले. ज्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून हिंदीतील ज्येष्ठ साहित्यिक मा. भगवानदास मोरवाल (दिल्ली) लाभले होते. तसेच दुसरे वक्ते सुप्रसिद्‌ध हिंदी साहित्यिक मा. जयप्रकाश कर्दम(दिल्ली) हे होते. तर सत्राध्यक्ष प्रा. (डॉ.) अर्जुन चव्हाण (माजी विभागप्रमुख, हिंदी विभाग, शिवाजी विद्‌यापीठ, कोल्हापूर) होते.

**सत्र दुसरे**

सदर सत्र हे मराठी विषयाचे होते. डॉ. तेजस चव्हाण यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रमुख वक्ते प्रसिद्‌ध कवी व समीक्षक मा. डॉ. दत्तात्रय डांगे (सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्‌यालय (स्वायत्त), पंढरपूर) हे होते. यांनी 'भटक्या-विमुक्त जाती व जमातीच्या साहित्याचे स्वरूप' या विषयावर अभ्यासपूर्ण व प्रभावी व्याख्यान दिले.

सत्राध्यक्ष म्हणून साहित्यिक व समीक्षक मा. डॉ. संदिप भुयेकर (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, बनारस विश्व हिंदू विद्यालय, बनारस, उत्तरप्रदेश) लाभले होते. त्यांनी वंचित व शोषित साहित्याचा धावता आढावा घेतला. या सत्राचे आभार प्रदर्शन विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी केले. अशाप्रकारे चर्चासत्राच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमांची सांगता झाली.

**<u>दिवस दुसरा-</u> २६ नोव्हेंबर, २०२१ वार- शुक्रवार**

दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी राष्ट्रीय परिषदेचा दुसरा दिवस.

या दिवशी मराठी, हिंदी व इंग्रजी विषयाचे समांतरपणे शोधनिबंध सादरीकरण करण्यात आले. मराठी विषयाचे सत्राध्यक्ष म्हणून मा. डॉ.रमेश शिंदे (मराठी विषय, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त), जि. सोलापूर) यांनी शोधनिबंधांचे परीक्षण केले. तसेच मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर समारोप समारंभ (Valedictory Function) घेण्यात आला.

समारोप समारंभाचे प्रास्ताविक प्रा. दिलीप कोने यांनी केले. प्रमुख पाहुणे मा. डॉ. संभाजी भांबर (Chairman, BoS English, Shivaji University, Kolhapur) हे होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम होते. यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी या तीनही विभागाचे कौतुक केले. आभार प्रदर्शन प्रा. नितीन कुंभार यांनी केले.

दोन दिवसीय परिषदेचे दोन्ही दिवस सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व प्रा. नम्रता कांबळे यांनी केले. तंत्रसहाय्यक म्हणून प्रा. दिनेश ससाणे व प्रा. धनेश गवारी यांनी कामकाज पाहिले. संयोजन समितीतील पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले. ही दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद दि. २५ व २६ नोव्हेंबर २०२१ रोजी यशस्वीपणे पार पडली. या परिषदेसाठी एकूण सभासद नोंदणी १८३ इतकी झाली होती.

## राष्ट्रीय परिषदेची क्षणचित्रे (२५ व २६ नोव्हेंबर २०२१)





















मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
RAMANANDNAGAR (BURLI)

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.